## 21. उच्च न्यायालय
## भाग VI - कलम 214 ते 231

- **स्वीकृती** - इंग्लंड.
- घटनेच्या भाग VI आणि कलम 214 ते 231 मध्ये उच्च न्यायालयाचे संघटन, स्वातंत्र्य, रचना व अधिकार इत्यादी तरतुदी देण्यात आल्या आहेत.
- भारतात 1861 च्या इंडियन हायकोर्ट ॲक्टनुसार उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.
- **भारतातील पहिले 4 उच्च न्यायालये -**

  1) कलकत्ता - 31 जानेवारी, 1862 2) बॉम्बे - 14 ऑगस्ट, 1862

  3) मद्रास - 14 ऑगस्ट, 1862 4) अलाहाबाद - 1866
- भारत सरकारने 2013 मध्ये 22 वे उच्च न्यायालय मणिपूर व 23 वे मेघालय 25 मार्च, 2013 रोजी स्थापन केले तर 24 वे उच्च न्यायालय त्रिपुरा हे 26 मार्च, 2013 रोजी स्थापन केले.
- भारतातील 25 वे उच्च न्यायालय - अमरावती (आंध्रप्रदेश) - 1 जानेवारी, 2019. रोजी स्थापना करण्यात आले आहे.
- भारतात सध्या 28 घटकराज्ये व 8 केंद्रशासित प्रदेशासाठी 25 उच्च न्यायालये कार्यरत आहेत.

### भारतातील २५ उच्च न्यायालये

| अ.क्र. | उच्च न्यायालयाचे नाव | स्थापना वर्ष | प्रादेशिक अधिकार क्षेत्र | खंडपीठ |
|---|---|---|---|---|
| १. | कलकत्ता | ३१ जानेवारी १८६२ | प.बंगाल, अंदमान निकोबार | पोर्ट ब्लेअर,जलपायगुडी |
| २. | मुंबई | १४ ऑगस्ट १८६२ | महाराष्ट्र, गोवा, दीव-दमण, दादर नगर हवेली | नागपूर,औरंगाबाद,पणजी, |
| ३. | चेन्नई | १४ ऑगस्ट १८६२ | तामिळनाडू, पद्दुचेरी | मदुराई |
| ४. | अलाहाबाद | १८६६ | उत्तरप्रदेश | लखनौ |
| ५. | पंजाब व हरियाणा | १८७५ | पंजाब,हरियाणा,चंदीगढ | - |
| ६. | बेंगळुरु | १८८४ | कर्नाटक | गुलबर्गा,धारवाड |
| ७. | पाटणा | १९१६ | बिहार | - |
| ८. | जम्मू-काश्मिर | १९२८ | जम्मु-काश्मिर, लडाख | - |
| ९. | गुवाहाटी | १९४८ | आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम | इटानगर, ऐजवाल,कोहिमा |
| १०. | कटक | १९४८ | ओडिसा | - |
| ११. | जोधपूर | १९४९ | राजस्थान | जयपूर |
| १२ | हैद्राबाद | १९५४ | तेलंगणा | - |
| १३. | जबलपूर | १९५६ | मध्यप्रदेश | ग्वाल्हेर, इंदौर |
| १४. | एर्नाकुलम | १९५८ | केरळ, लक्षद्विप | - |
| १५. | अहमदाबाद | १९६० | गुजरात | - |
| १६. | दिल्ली | १९६६ | दिल्ली | - |
| १७. | सिमला | १९७१ | हिमाचल प्रदेश | - |
| १८. | गंगटोक | १९७५ | सिक्कीम | - |
| १९. | बिलासपूर | १ नोव्हेंबर २००० | छत्तीसगढ | - |
| २०. | नैनिताल | ९ नोव्हेंबर २००० | उत्तराखंड | - |
| २१. | रांची | १५ नोव्हेंबर २००० | झारखंड | - |
| २२. | इंम्फाळ | २५ मार्च २०१३ | मणिपूर | - |
| २३. | शिलाँग | २५ मार्च २०१३ | मेघालय | - |
| २४. | अगरताळा | २६ मार्च २०१३ | त्रिपूरा | - |
| २५. | अमरावती | ०१ जानेवारी २०१९ | आंध्रप्रदेश | - |

▪ **भारतातील सामाईक उच्च न्यायालये -**

1) **बॉम्बे -** महाराष्ट्र, गोवा, दिव-दमण, दादर-नगरहवेली

2) **गुवाहाटी -** अरुणाचलप्रदेश, आसाम, नागालँड, मिझोराम

3) **पंजाब व हरियाण -** पंजाब, हरियाणा, चंदीगढ

4) **जम्मू व काश्मीर -** जम्मू, काश्मीर, लडाख

▪ **राजधानीचे ठिकाण सोडून इतर शहरात कार्यस्थान असणारे उच्च न्यायालये -**

| राज्य | राजधानी | उच्च न्यायालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| उत्तरप्रदेश | लखनौ | अलाहाबाद |
| मध्यप्रदेश | भोपाल | जबलपूर |
| उत्तराखंड | डेहराडून | नैनिताल |
| राजस्थान | जयपूर | जोधपूर |
| ओडिसा | भुवनेश्वर | कटक |
| आसाम | दिसपूर | गुवाहाटी |
| छत्तीसगढ | रायपूर | बिलासपूर |
| केरळ | तिरुअनंतपुरम | अर्नाकुलम |

▪ **केंद्रशासित प्रदेश आणि उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र -**

दिल्ली - दिल्ली
जम्मू-काश्मीर - जम्मू-काश्मीर
दिव व दमण,
दादरा नगरहवेली - बॉम्बे
अंदमान निकोबार - कलकत्ता
लक्षद्वीप - अर्नाकुलम
चंदीगढ - पंजाब व हरियाणा
पद्दुचेरी - मद्रास/चेन्नई
लडाख - जम्मू-काश्मीर

▪ दिल्ली व जम्मू-काश्मीर हे स्वत: चे उच्च न्यायालय असणारे केंद्रशासित प्रदेश आहेत.

▪ **उच्च न्यायालये आणि त्यांची खंडपीठे -**

| उच्च न्यायालये | खंडपीठ |
|---|---|
| अलाहाबाद | लखनौ |
| बॉम्बे | नागपूर, पणजी, औरंगाबाद<br>नियोजीत - कोल्हापूर (फिरते खंडपीठ) |
| कलकत्ता | पोर्ट ब्लेअर (पहिले फिरते खंडपीठ) |
| गुवाहाटी | इटानगर, ऐजवाल, कोहिमा |
| जबलपूर | ग्वाल्हेर, इंदौर |
| चेन्नई | मदुराई |
| पाटना | रांची |
| जोधपूर | जयपूर |
| बेंगलोर | नियोजित - धारवाड, गुलबर्गा |

▪ **कलम 214 -** प्रत्येक राज्यासाठी उच्च न्यायालय असेल. 1956 च्या 7 व्या घटनादुरुस्तीनुसार 1 किंवा 2 राज्यासाठी व एका केंद्रशासित प्रदेशासाठी उच्च न्यायालय असेल.

▪ **कलम 215 -** उच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असते. कनिष्ठ न्यायालय किंवा व्यक्तीने उच्च न्यायालयाचा अवमान केल्यास न्यायालय त्यास शिक्षा ठोठावते.

▪ **कलम 216 -** उच्च न्यायालयाची संरचना. उच्च न्यायालयात 1 मुख्य न्यायाधीश राष्ट्रपती निश्चित करतील एवढे इतर न्यायाधीश असतील. म्हणजेच उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची संख्या राष्ट्रपती ठरवतील.

▪ **कलम 217 -** उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती व त्याबाबतच्या शर्यती.

**मुख्य न्यायाधीश -** राष्ट्रपती, सरन्यायाधीश व संबंधित राज्याच्या राज्यापालाच्या विचाराने नियुक्ती करतात.

**इतर न्यायाधीश -** राष्ट्रपती, सरन्यायाधीश व संबंधित राज्याच्या राज्यापाल तसेच संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या विचाराने नियुक्ती करतात.

**सामाईक उच्च न्यायालयाचे न्यायधीश -** राष्ट्रपती संबंधी सर्व राज्यांच्या राज्यपालांच्या विचाराने नियुक्ती करतात.

▪ **कलम 217(1) -** न्यायाधिशांचा कार्यकाल सर्वसाधारण 6 वर्षे किंवा वयाच्या 62 वर्ष.

▪ **कलम 217(2) -** न्यायाधिशांची पात्रता. भारताचा नागरिक. भारतातील न्यायालयात 10 वर्षे न्यायीक पदावर किंवा 10 वर्षे वकीलीचा अनुभव.

▪ **कलम 218 -** सर्वोच्च न्यायालयासंबंधीच्या काही तरतुदी उच्च न्यायालयाला लागू करणे. सर्वोच्च न्यायालय आपले काही अधिकार उच्च न्यायालयाकडे वर्ग करते.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **कलम 219 -** उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाकडून शपथ किंवा प्रतिज्ञा. मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश - राज्यपाल.
- **कलम 220 -** कायमस्वरुपी न्यायाधीश झाल्यानंतर व्यवसाय करण्यावर बंधन. उच्च न्यायालयाचे मुख्य आणि इतर न्यायाधीश यांना न्यायाधीश झाल्यावर व सेवानिवृत्तीनंतर व्यवसाय करता येणार नाही.
- **कलम 221 -** उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वेतन व भत्ते. संसद कायद्याद्वारे वेळोवेळी उच्च न्यायालयाचे मुख्य व इतर न्यायाधीश यांचे वेतन व भत्ते निश्चित करते. पदावर असताना राज्याच्या संचित निधीतून तर सेवानिवृत्तीनंतर केंद्राच्या संचित निधीतून वेतन दिले जाते.
- **कलम 222 -** एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयात न्यायाधीशांची बदली. राष्ट्रपती सरन्यायाधीशांच्या विचारानुसार एका उच्च न्यायलयातील मुख्य न्यायाधीशाची व इतर न्यायाधीशांची दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली करतात.
- **कलम 223 -** प्रभारी/हंगामी मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती. राष्ट्रपती उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पद रिक्त झाल्यास तो अनुपस्थित असल्यास, पदावर असताना मृत्यु झाल्यास किंवा राजीनामा दिल्यास त्याठिकाणी हंगामी मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती करतात.
- **कलम 224 -** अतिरिक्त किंवा प्रभारी न्यायाधीशांची नियुक्ती. राष्ट्रपती उच्च न्यायालयातील कामकाजात वाढ झाल्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीस 2 वर्षापेक्षा कमी काळासाठी हंगामी न्यायाधीश म्हणुन नेमणुक करतात.
- **कलम 224(A) -** उच्च न्यायालयाच्या बैठकीसाठी निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती. राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश निवृत्त न्यायाधीशांची तात्पुरती न्यायाधीश म्हणुन नियुक्ती करतात.
- **कलम 225 -** विद्यमान उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र. प्रारंभिक अधिकार, प्राधिलेख अधिकार, पर्यवेक्षणाचे अधिकार, दुय्यम न्यायालयावर नियंत्रण, अभिलेख न्यायालय, न्यायालयीन पुर्नविलोकन.
- **कलम 226 -** काही आदेश जारी करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार. मुलभूत हक्काबाबत बंधने निर्माण होत असतील तर उच्च न्यायालय 5 आदेश जारी करते. बंदीप्रात्यक्षीकरण, परमादेश, उत्प्रेक्षण, अधिकारपृच्छा, प्रतिषेद.
- **कलम 227 -** उच्च न्यायालयाचा सर्व न्यायालयावर पर्यवेक्षणाचा अधिकार. उच्च न्यायालय त्या राज्यातील सर्व कनिष्ठ न्यायालयावर नियंत्रण ठेवते.
- **कलम 228 -** काही खटले उच्च न्यायालयाकडे वर्ग करणे. कनिष्ठ न्यायालयातील काही खटले उच्च न्यायालय स्वत: कडे वर्ग करुन घेते.
- **कलम 229 -** उच्च न्यायालयाच्या अधिकारी, कर्मचारी यांचा खर्च. या सर्वांचा खर्च राज्याच्या संचित निधीवर आधारित असतो.
- **कलम 230 -** संघराज्य किंवा संघराज्य प्रदेशांना उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र लागू करणे. संसद कायद्याद्वारे एखादा संघराज्य प्रदेश दुसऱ्या राज्यातील उच्च न्यायालयातील अधिकार क्षेत्रामध्ये समाविष्ट करते.
- **कलम 231 -** 2 किंवा अधिक राज्यासाठी एका संयुक्त उच्च न्यायालयाची स्थापना करणे. संसद कायद्याद्वारे 2 किंवा 2 पेक्षा राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेश संयुक्त उच्च न्यायालयाची स्थापना करते.